Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

# पर्यावरणीय संवेदन आणि मराठी साहित्य

**डॉ राजीव के. आरके**
बं.नं.१०, चंद्रवेल हाऊसिंग सोसायटी,फेज-१,
यशवंत विनय शाळेच्या बाजूला,
वलवाडी शिवार, नकाणे रोड, देवपूर , धुळे
पिन ४२४००२.(महाराष्ट्र)
8625040196/8830116787.

मानवी जीवनासंदर्भात 'परिसर' ही अत्यंत अर्थपूर्ण आणि अपरिहार्य अशी संकल्पना आहे. अपरिहार्य या अर्थाने की मानवाच्या एकंदरच जगण्यावर ती अत्यंत प्रभाव टाकत असते .मानवाची जी सर्वंकष जडणघडण होते तीच परिसराच्या बहुमितीय प्रभावांतून होत असते. मानवाची जैविक घडून ही व्यापकार्थाने नैसर्गिक बाब असली ,तरी त्याची शारीरिक व सांस्कृतिक घडणही परिसराच्याच संदर्भाने होत असते. प्रत्येकच परिसर हा वैशिष्ट्यपूर्ण असतो .कारण तो परिसर एक वैशिष्ट्यपूर्ण पर्यावरण राखून असतो .त्या परिसराचे प्राकृतिक स्थान, भौगोलिक रचना ,नद्या ,नाले डोंगर ,शेतीपाती, जंगल ,झाडे- झुडपे पशुपक्षी कीटक ,सरीसृप इत्यादी घटकांचे अस्तित्व त्या परिसराला वैशिष्ट्यपूर्ण पर्यावरण बहाल करीत असते. कोणताही मानव हा त्या विशिष्ट परिसराच्या पर्यावरणाचा अविभाज्य भाग असतो .मानवाच्या संदर्भात हे पर्यावरण जसे अपरिहार्य असते तसे अर्थपूर्णही असते. कारण मानवाचे जगणे हे पर्यावरणाच्या अनुषंगाने अर्थपूर्ण ठरत असते .केवळ जगणेच नव्हे ,तर मरणेही पर्यावरणाच्या अनुषंगाने अर्थपूर्ण ठरणारे असते. मानवाच्या जीवनानुभवांची इतिकर्तव्यता परिसर व त्या परिसराच्या पर्यावरणातच सिद्ध होत असते .म्हणून पर्यावरण हा मानवी जीवनाचा भाग नाही ,तर मानवी जीवन हेच पर्यावरणाचा भाग असते. 'जसे पर्यावरण तसा माणूस 'यातून माणूस आणि पर्यावरण यांचे साहचर्य अधोरेखित होते.

माणसाच्या संदर्भात'पर्यावरण 'ही एक बहुमितीय संकल्पना ठरते .भौगोलिक ,सामाजिक , राजकीय, आर्थिक, धार्मिक ,भाषिक ,वंशिक अशा सर्वच मितींनी पर्यावरणाचे स्वरूप निश्चित होत असते .पर्यावरणाच्या या बहुमितीय संस्कारातूनच मानवी जीवन संस्कारीत व समृद्ध होत असते. माणसाच्या हातून घडवून येणारे सर्व आविष्कार हेही पर्यावरणाच्या संस्कारातूनच आविष्कृत होत असतात. पर्यावरणच त्या सर्व आविष्कारांना माध्यम व साधने पूरवित असते. मानवी अस्तित्वाची अर्थपूर्णता ही काही निर्वात पोकळीत सिद्ध होणारी गोष्ट नसते ,तर पर्यावरणाच्याच आधाराने ,संदर्भाने ती सिद्ध होत असते .परंतु असे असले तरी माणूस हा नैसर्गिक पर्यावरणाने जसे ठेवले तसेच अर्थात 'ठेविले अनंते तैसेचि राहावे 'या वृत्तीने न राहता तो निसर्गाला ,त्याच्या भोवतालच्या पर्यावरणाला संवादी -विसंवादी राहतो .अनेकदा तो पर्यावरणाशी एकरूपही होतो आणि अनेकदा तो पर्यावरणात हस्तक्षेप करून त्याला आपल्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्नही करीत असतो .माणसाची 'माणूस हा एक निर्मितीशील प्राणी आहे 'ही व्याख्या त्याच्या पर्यावरणाशी चाललेल्या संवादी -विसंवादी वर्तनातूनच सिद्ध होते .पर्यावरणाला सामोरे जाण्याच्या गरजेतूनच माणसाने समाज निर्माण केला ,संस्कृती निर्माण केली ,भाषा ,लिपी ,साहित्य हे त्या संस्कृतीचे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

महत्त्वाचे घटकांगे मानले जातात .कारण भाषा ,साहित्य हे केवळ माणसाचे जीवनाअनुभव व्यक्त करीत नाहीत ,तर ते जीवनानुभव ज्या पर्यावरणीय संस्कारातून आकाराला आलेले आहेत त्या पर्यावरणालाही अभिव्यक्त करीत असतात. परिणामतः भाषा व साहित्य हे त्या त्या परिसराचे ,त्या परिसराच्या पर्यावरणाचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे अविष्कार असतात .'दर दहा कोसावर भाषा बदलते 'या विधानाचा मथितार्थ तोच आहे.

प्रस्तुत लेखातून 'पर्यावरण' ,'साहित्य','पर्यावरणीय संवेदन 'या संकल्पनांच्या अनुषंगाने 'पर्यावरणीय सवेदन आणि मराठी साहित्य 'यांच्यातल्या अनुबंधाचे स्वरूप समजून घ्यावयाचे आहे.

**पर्यावरण :संकल्पना व स्वरूप**

मराठी भाषेमध्ये 'पर्यावरण 'हा शब्द इंग्रजीतील 'एन्व्हायरॉन'( टू सराऊंड) या शब्दासाठी प्रचलित असून त्याचा अर्थ 'मानवाच्या सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती' असा घेतला जातो .पर्यावरणाचा अभ्यास हा मानवी ज्ञान क्षेत्रातला एक महत्त्वाचा अभ्यास असून मानवाच्या अस्तित्वाला अस्मिता आणि अर्थपूर्णतः लाभण्याच्या दृष्टीनेही तो महत्त्वाचा आहे .त्यामुळे मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधातून एक नवीन विद्याशाखा निर्माण झालेली असून तिला पर्यावरण शास्त्र असे म्हणतात. आज 'पर्यावरण शास्त्र 'ही एक प्रगत ज्ञानशाखा असून तिला आज स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणूनही स्थान प्राप्त झाले आहे .अनेक पर्यावरण शास्त्रज्ञांनी 'पर्यावरण 'या संकल्पनेचा नेमका अर्थ व व्याख्या देण्याचे प्रयत्न केलेले आहेत. ' पर्यावरण 'संकल्पना समजून घेण्यासाठी त्यांचा आढावा या ठिकाणी घेणे महत्त्वाचे आहे.

पर्यावरण शास्त्रज्ञ जॅकी स्मिथ यांच्या मते "सजीवांनी स्वतःभोवतालच्या अनुभवलेल्या एकूण प्राकृतिक, रासायनिक व जैविक परिस्थितीला पर्यावरण असे म्हणतात .यात हवामान ,मृदा ,जल, प्रकाश,आसपासच्या वनस्पती ,सजीवाच्या स्वतःच्या जातीचे अन्य सदस्य ,तसेच इतर सजीव जातींचे सदस्य यांचा समावेश होतो."(१)तर फंक आणि वेगानल्स यांच्यामते, "व्यक्ती ,जीव किंवा समूह यांचे अस्तित्व व विकास यांच्यावर परिणाम करणारी बाह्य स्थिती ,घटक किंवा वस्तू म्हणजे पर्यावरण होय ."(२)डॉ. विजय पाटील यांच्या मते ,"पर्यावरण ही स्थल ,कालसापेक्ष तसेच जीवनसापेक्ष व व्यापक संज्ञा आहे .लहानात लहान ते मोठ्यात मोठ्या अशा सर्व घटकांचे जटिल संमिश्रण आहे ."(३) उपर्युक्त सर्वच व्याख्यांतून 'पर्यावरण 'संकल्पनेची व्यापकता आणि जटिलता अधोरेखित होते .माणसाच्या हातून घडणाऱ्या सर्व निर्मिती या तो ज्या पर्यावरणात वास्तव्य करून राहतो त्या पर्यावरणाच्या भाग असतात .किंबहुना त्या सर्वच निर्मितीतून पर्यावरण डोकावताना दिसते .साहित्य हेही त्याला अपवाद नाही त्यामुळे 'साहित्य 'ही संकल्पना ही समजून घेणे या ठिकाणी महत्त्वाचे आहे.

**साहित्य: संकल्पना व स्वरूप**

'साहित्य 'ही एक आधुनिक संकल्पना असून इंग्रजीतील 'लिटरेचर 'या शब्दासाठी ती मराठीमध्ये वापरली जाते .भारतासंदर्भात आधुनिक कालखंड म्हणून एकोणिसाव्या शतकाचा निर्देश केला जातो. कारण याच कालखंडामध्ये भारतात आधुनिक शिक्षणाचा ,मर्यादित मर्यादित का असेना, प्रसार होऊन त्याद्वारे पाश्चात शास्त्रे ,कला ,साहित्य विचारांची ओळख प्रथमच भारतीयांना झाली .त्यांच्या कला व साहित्य विषयक विचारांच्या परिचयातून भारतीय साहित्याविषयी संशोधन, चर्चा -चिकित्सा होत जाऊन भारतातही साहित्य संकल्पनेविषयी विविध संस्कृत मीमांसकांनी आपापले मते प्राचीन काळी ग्रंथीत करून ठेवली

https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0011
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

असल्याचे दिसून आले .जसे आद्य संस्कृत साहित्यशास्त्रकार 'सहितस्य भाव इति साहित्य ',अशी साहित्याची व्याख्या करताना दिसतात. इ.स.पू.दुसऱ्या शतकात होऊन गेलेला भरत 'दृकश्राव्य काव्य नाट्यम 'अशी काव्याची व्याख्या करतो ,तर 'शब्दार्थ सहितो काव्यम'अशी व्याख्या भामह करतो .'काव्य ग्राह्य अलंकारात सौंदर्य अलंकार' अशी व्याख्या आठव्या शतकात वामन करतो .त्याचवेळी 'ननु शब्दार्थ काव्य 'अशी काव्याची व्याख्या रुद्रट करताना दिसतो .14 व्या शतकातला विश्वनाथ 'वाक्यरसात्मक काव्य 'अशी काव्याची व्याख्या करतो ,तर शेवटचा संस्कृत साहित्यशास्त्रकार जगन्नाथ 'रमनणियार्थ प्रतिपादक शब्द काव्य .'अशा शब्दात काव्याचे स्वरूप सांगतो ,तर 'काव्यस्य आत्मा -ध्वनी' अशी काव्याची व्याख्या सांगतो. उपर्युक्त सर्व संस्कृत साहित्य मीमांसकांच्या व्याख्या पाहिल्या तर लक्षात येते की , प्राचीन भारतामध्ये साहित्याच्या व्याख्या या नाटक आणि काव्य यांच्या अंगाने होत आल्याचे दिसते. तसेच साहित्याच्या व्याख्या या प्रत्येक काळात बदललेल्या आढळतात .म्हणजेच शब्द ,अर्थ ,रस ,अलंकार या अनुषंगाने त्या होत आलेल्या दिसतात.

संस्कृत साहित्यशास्त्र मीमांसकांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्या समजून घेण्याबरोबरच आंग्ल समीक्षकांनी केलेल्या साहित्याचे व्याख्या समजून घेणे ही या ठिकाणी महत्त्वाचे आहे .कारण वर म्हटल्याप्रमाणे 'साहित्य'ही एक आधुनिक संकल्पना आहे .जी खरे तर पाश्चात्य अर्थात युरोपीय आंग्ल साहित्य विचार -विमर्शातून आधुनिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कालखंडात उदय पावलेली आहे .18 व्या शतकाच्या मध्यावर जेव्हा आधुनिक शिक्षण देणारी विद्यापीठे भारतात स्थापन झाली तेव्हा पाश्चात्य युरोपीय साहित्य ,कला व संस्कृतीच्या परिचय व प्रभावातून त्या भारतीय साहित्य मीमांसाक्षेत्रात अवतिर्ण झाल्या .त्यांचाही परिचय करून घेणे या ठिकाणी आवश्यक वाटते . आंग्ल समीक्षक कोलरीजच्या मते ,'द बेस्ट वर्ड्स इन द बेस्ट ऑर्डर 'म्हणजे काव्य होय .अर्थात 'उत्तम शब्दांची उत्तमचना म्हणजे काव्य' तर हॅजलिटच्या मते ,काव्य म्हणजे 'द लँग्वेज ऑफ इमॅजिनेशन अँड द पॅशन्स'अर्थात 'कल्पना आणि भावनांनी ओथंबली रचना म्हणजे काव्य होय '.मॅथ्यू अरनोल्डच्या मते काव्य म्हणजे 'द मोस्ट डिलाईट फुल अँड परफेक्ट फॉर्म ऑफ अटरन्स दॅट ह्यूमन वर्ड्स् कॅन रिच 'अर्थात 'मानवी शब्दांना शक्य असलेल्या आनंददायी आणि परिपूर्ण स्वरूपाचा उद्‌गार म्हणजे काव्य '.तर कारलाईच्या मते 'पोएट्री इज म्युझिकल थॉट '.अर्थात 'काव्य म्हणजे लयबद्ध विचार होय' पण वर्डस्वथच्या मते 'पोएट्री इज द स्पॅान्टॅनियस ओव्हरफ्लो ॲाफ पॉवरफुल फीलिंग्स रिकलेक्टेड इन ट्रॅन्क्यालिटी.'अर्थात 'मनाच्या शांत अवस्थेतील पुनस्मृत अशा उत्कट भावनांचा सहजोद्रेक म्हणजे काव्य ". उपर्युक्त आंग्ल समीक्षकांच्या व्याख्यांचा चिकित्सकपणे विचार करता लक्षात येते की ,पाश्चात्य साहित्यसमीक्षक व अभ्यासकांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्याही काव्याच्या अनुषंगाने झालेल्या दिसतात आणि त्याही बहुविध स्वरूपाच्या म्हणजेच शब्द ,कल्पना ,भावना ,लयबद्ध रचना ,आनंद अशा घटकांच्या अनुषंगाने ! यामागचे सहजच लक्षात येणारे कारण म्हणजे भारतीय व पाश्चात्त्य साहित्य चर्चेत काव्य हाच आद्य मानवी उद्‌गार मानला गेला .ज्याच्या मुळाशी निश्चितच एक समान जाणीव दिसते .गध्यात्मकतेच्या अंगानेही साहित्याच्या व्याख्या आधुनिक कालखंडात झाल्या ज्या शब्द आणि अर्थाबरोबरच मानवी व सामाजिक जीवनाच्या संदर्भांनी केला गेल्या .जसे ''साहित्य म्हणजे मानवी जीवनाचा अन्वयार्थ '.(४)ही मराठी साहित्याचे साक्षेपी समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्लींची व्याख्या लक्षात घेण्यासारखी आहे .कारण साहित्य अथवा "वांग्मय संदर्भ बहुल असते" ,(५)हे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

रा.ग.जाधवांचे निरीक्षण साहित्य वांड्मयाच्या जीवनसापेक्षतेवर नेमकेपणाने बोट ठेवणारे आहे.

**पर्यावरणीय संवेदन :संकल्पना**

विद्यमान कालखंड हा वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळ्या नामाभिधानांनी ओळखला जातो .वर म्हटल्याप्रमाणे साहित्य वा वाङ्मय हे संदर्भबहुल असते .संदर्भ बहुलतेमुळेच वाङ्मयाला सापेक्षता प्राप्त होते. विद्यमान कालखंड हा 'स्वातंत्र्योत्तर कालखंड 'म्हणून ओळखला जातो .या कालखंडामध्ये एक देश म्हणून भारताच्या विकासासाठी घटनात्मक मार्गांचा अवलंब करून शेती ,शिक्षण ,आरोग्य ,विज्ञान -तंत्रज्ञान ,उद्योग अशा विविध क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरण आखून त्याप्रमाणे त्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठीचे प्रयत्न करण्यात आले .पर्यावरण क्षेत्र हे असेच एक महत्त्वाचे क्षेत्र होते, ज्या बाबतीत समाजात जनजागृती घडवून आणणे आवश्यक होते. कारण माणसाला त्याचा जो सामाजिक ,आर्थिक ,राजकीय ,सांस्कृतिक विकास घडवून आणायचा होता तो निर्वात पोकळीत घडून येणारा नव्हता ,तर तो पर्यावरण नामक जिवंत वस्तुस्थितीमध्ये घडवून आणायचा होता. पर्यावरणाला जीवविज्ञान आणि परिस्थितीविज्ञानाचे जे संदर्भ असतात त्यासंदर्भाला वगळून माणसाला त्याचा ,तो ज्या परिसरात वास्तव्य करून राहतो त्या परिसराचा विकास घडवून आणणे शक्य नाही. अर्थात या विकासाची पूर्व अट म्हणून समाजात पर्यावरणविषयक जाणीव निर्माण होणे गरजेचे असते .स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतात जे अनेक प्रकारचे संवेदनं विकसित झालेले दिसतात त्यात पर्यावरण संवेदन अत्यंत महत्त्वाचे आहे .म्हणूनच या कालखंडाला 'पर्यावरणीय प्रबोधन युग 'असेही म्हटले गेले.

माणूस हा जसा समाजशील प्राणी आहे तसाच तो निर्मितीशील प्राणीही आहे .तो अनेकविध स्वरूपाच्या निर्मिती साधताना दिसतो .त्यात कला महत्त्वाच्या आहेत. आनंद अथवा सौंदर्य निर्मिती करण्याच्या उर्मीतून या कला निर्माण होतात म्हणून त्यास ललित कला असे म्हटले जाते.माणूस निर्माण करीत असलेल्या या सर्वच ललित कला या संदर्भ बहुल असतात .साहित्य ही अशीच एक संदर्भ बहुल कला आहे .स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय समाजात जे पर्यावरणीय प्रबोधन घडून आले त्याचा परिणाम साहित्यातील ललित कलांवर पडणे अपरिहार्य होते .हा परिणाम दाखविणाऱ्या अनेक गोष्टी दृष्टीस पडतात. सन १९४७ पासून ते आजतागायत मराठीत हजारो शास्त्रीय पुस्तकांची निर्मिती झाली, शेकडो पर्यावरण विषयक लेख विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले ,हवामानातील तापमान वाढ ,अचानक येणारी वादळे ,जलसंकट ,झाडांची होणारी बेसुमार कत्तल ,वाढते शहरीकरण, विकासाचा अतिरेकी विचार व त्याचा मानवी पर्यावरणावर होणारा परिणाम , वितळणारे हिमनग व त्यातून येणारे पूर, दुष्काळ, वैश्विक तापमान वाढ या सर्व भौगोलिक पर्यावरणीय घटनांबद्दल राष्ट्रीय व जागतिक स्तरावरून होत असलेल्या शिखर परिषदा, त्यात विकसित व अविकसित राष्ट्रांमध्ये न होणारे मतैक्य या सर्वामुळे मानवी समाजात पर्यावरण विषयक भान निर्माण झाले .त्याला 1958 साली भारताने जाहीर केलेल्या विज्ञान विषयक अधिकृत धोरणाचा हातभार लागला .या धोरणामुळे नव्या वैज्ञानिक ,तांत्रिक आणि औद्योगिक व कृषी विषयक प्रकल्पांना ,उपक्रमांना चालना मिळाली .नैसर्गिक साधन संपत्तीचा शोध घेण्यात येऊ लागला .यातून पर्यावरणीय भान तर निर्माण झालेच पण त्याचबरोबर पर्यावरणाचे संस्कृतीकरणही घडून आले .ज्यातून नवी समृद्धी निर्माण होण्याबरोबरच नव्या समस्याही उत्पन्न झाल्या .त्यावर उपाययोजना म्हणून वृक्ष संवर्धन, दुर्मिळ व दुर्मिळ नसलेल्या प्राणीजातांचे संरक्षण, जल नियंत्रण विषयक योजना हाती घेण्यात आल्या .अभयारण्य राखीव

https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0011

करणे ,विशिष्ट भूभाग, ऐतिहासिक वास्तूंचे व्यवस्थापन इत्यादी प्रकल्पांना चालना देण्यात आली .शालेय अभ्यासक्रमातून जीवविज्ञान, प्राणी विज्ञान ,वनस्पती विज्ञान असे नवनवे विषय प्रविष्ट झाले .या सर्वच धोरणे व उपाययोजनांतून नैसर्गिक पर्यावरणाबाबत दखल जाणीव निर्माण झाली .ही जाणीव हळूहळू समाजात सर्वच क्षेत्रांमध्ये पसरत गेली .त्यातून पर्यावरणाच्या जैविक व्यापक परिघाचे संवेदन विकसित होऊ लागले . तसेच "पर्यावरण विषयक एक नवे नैतिक-सांस्कृतिक भान प्रकट होऊ लागले. निसर्ग व माणूस यांच्यातील नात्याला वैज्ञानिक व भावनात्मक सामंजस्याचा, सौहार्दाचा नवा आयाम प्राप्त झाला .त्या नात्यातील दैव व दुरावा कमी होऊन त्यांची जागा द्वंद्वात्मक परस्परपूरकता व जवळीक यांना स्थान लाभले .तसेच समाजात प्रत्यक्ष कृतींच्या पातळीवही ते भान विविध स्वरूपात प्रकट होऊ लागले. निसर्ग निरीक्षण ,पक्षी निरीक्षण ,गिर्यारोहण ,दुर्गभ्रमण ,अरण्य निरीक्षण, जलविहार ,जल पर्यटन ,नदी प्रवाह , खाड्या -समुद्र यावरील सफरी ,प्रेक्षणीय स्थळी पर्यटन ,आकाश निरीक्षण ,तारका दर्शन, ननक्षत्रावलोकन, ग्रहण दर्शन यासारखे उपक्रम राबविणारे विविध प्रकारचे क्लब्स, संघटना ,संस्था ,प्रायोजक निर्माण झाले. वृत्तपत्रे ,दूरदर्शन, आकाशवाणी यासारख्या प्रसारमाध्यमांनी या नव्या उपक्रमांची पुरेशी दखली घेतली. युवक -युवतींना नैसर्गिक व मनुष्यकृत पर्यावरणाच्या नाना अंगोपांगांची ओळख होत गेली .पर्यावरणविषयक व्यापक वास्तव जाणीव यातून उदयास आली ."(६)परिणामतः यातून स्वच्छंदतावाद एका नव्या कृतिशील संवेदनशील भूमिकेतून अवतरला .त्यात सौंदर्याची सत्याची ,स्पृहा आहे .तसेच बुद्धी ,विज्ञान ,उपयुक्तता यांच्याविषयी आग्रह व आस्था आहे.

तात्पर्य , पर्यावरणीय जाणीव म्हणजे माणसाच्या भोवतालचे लांबी ,रुंदी ,उंची अशा वैशिष्ट्यपूर्ण स्थूल आणि बृहस्तरावर अस्तित्वात असणाऱ्या नैसर्गिक सजीव निर्जीव घटकांसंदर्भात मानवी मनात निर्माण झालेल्या संवेदना होय.

**पर्यावरणीय ललित संवेदन आणि मराठी साहित्य**

'साहित्य 'ही एक सापेक्ष संकल्पना आहे .कारण ती संदर्भनिष्ठ असते .ती ज्या अवस्थेत निर्माण होते त्या अवस्थेचे एक निश्चित असे पर्यावरण असते .त्यामुळे आपसूकच त्या साहित्याला पर्यावरणाचे संदर्भ प्राप्त होतात. परंतु ते संदर्भ आपोआप निर्माण होत नाहीत, तर ते पर्यावरण संवेदनेतून निर्माण होतात. साहित्याचा निर्माता असणारा लेखक हा एक संवेदनशील घटक असतो. तो ज्या परिस्थितीत जन्म घेतो वाढतो ती परिस्थिती एका विशिष्ट पर्यावरणीय अवकाशात आकाराला आलेली असते .त्या परिसरातील सर्व सजीव -निर्जीव वस्तू व जीवमात्रांशी माणसाशी संबंध येतात .व्यक्तीच्या अनुषंगाने जेव्हा तो विचार करू लागतो ,तेव्हा त्या विचाराला ज्या अनेक गोष्टींचा संदर्भ असतो त्यात पर्यावरणीय जाणीव याचाही संदर्भ असतो .ही पर्यावरणीय जाणीव संवेदन जेव्हा सृजनशिलतेच्या पातळीवर उतरते तेव्हा ती लालित्य निर्माण करते .साहित्य हे त्या सृजनशीलतेची लालित्य पूर्ण निर्मिती ठरते. अर्थात "माणसाच्या जैविक व सांस्कृतिक पर्यावरणाचे कलात्मक ,क्रीडात्मक संवेदन म्हणजे त्यांचे ललित संवेदन व अशा प्रकारचे ललित संवेदन व्यक्त करणारी निर्मिती म्हणजे पर्यावरणीय ललित साहित्य ."(७)स्वातंत्र्यत्तर कालखंडामध्ये प्रस्थापित साहित्यात प्रवासवर्णने ,निसर्गपर लघुनिबंध व ललित लेख, विशिष्ट प्रकारचे विनोदी लेखन, पर्यटन चित्रण असे वेगवेगळे लेखन प्रकार तसेच परिसरातील पादप जात, प्राणी जात ,भूरूपे इत्यादींच्या

निरीक्षणातून ,संशोधनातून व प्रत्यक्ष सहजीवनातून प्रेरित होणारे लेखन अशा स्वरूपाच्या बहुविध लेखनाचा अंतर्भाव होतो.

'माणदेशी माणसं '(१९४९) लुटुची खंडोजी (मनमोहन) दुर्गा भागवतांचे 'ऋतुचक्र '(१९५६),वेंकटेश माडगूळकरांचेच 'सत्तांतर '(१९८२),अनंतराव कुलकर्णी यांचे 'मी जेनी'(१९८४), आनंद यादवांचे 'माऊली'(१९९४), अरविंद गोखले यांचे 'गहिरं'(१९९१) व शिंदे यांचे' सर्जा '(१९९४)अशी काही पुस्तके पर्यावरणीय साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. आधुनिक मराठीतील जैविक पर्यावरणीय संवेदनाचा मागवा घेताना उपर्युक्त पुस्तकांपैकी अरविंद गोखले यांचा 'गहिरं'हा कथासंग्रह महत्त्वाचा आणि पर्यावरणीय संवेदनांचा एक विकसित टप्पा दाखविणारा महिलाचा दगड म्हणता येईल. या कथासंग्रहातील 'गहिरं' ही कथा म्हणजे एक संपूर्ण व संपन्न अशी 'एकोसिस्टीम 'म्हणजे सजीव-अजीवांच्या नैसर्गिक विधिवास समर्थपणे साकार करणारी कथा आहे .जीववैज्ञानिक व परिस्थितीकीय म्हणजे इकॉलॉजिकल कल्पनांचा हा एकात्मक उत्कट व भावपूर्ण आविष्कार आहे .निसर्गात सजीव निर्जीवांचा विधिवास कशाला म्हणतात याची सजगता निर्माण करणारी ही कथा आहे .ती गोष्टीरूप स्वरूपाची नाही ,तर संस्कारदर्शी निवेदनाची लालित्यपूर्ण मांडणी आहे .या कथासंग्रहातली 'आदिमाया 'ही कथा विज्ञानाच्या अंगाने जाणारी एक चित्रमय कथाच आहे .जी जीवाच्या उत्पत्ती विषयी प्रतिपादन करते. नैसर्गिक घटकांच्या सरमिसळीतून जीव कसा अपघाती योगायोगाने निर्माण होतो याचे लालित्यपूर्ण दर्शन ही कथा घडवते .भावप्रत्ययकारीता, वेधकता ही या कथेची वैशिष्ट्ये ठरतात.

"मातीची पाण्याची प्राणवायूची
व खनिजांची मिळून नकळत निर्माण
झालेली निर्जीव संघटना चिखलाच्या
थेंबाच्या रूपाने उभी होती आणि त्यावर
अनु रेणूंच्या आश्चर्यकारक अपघाताने
जन्मलेला तो जीव मूडपणे खडा होता!
त्या हरवलेल्या हताश झालेल्या
जीवाला साऱ्या विश्वाचं कोडं पडलं होतं!"

हा उतारा म्हणजे जीवसृष्टीच्या उदयाचे पर्यावरणीय भान अधोरेखित करणारा साहित्यिक नमुनाच .कारण असा जीवाचा जन्मोत्सव प्राकृतिक पातळीवर केवळ अशक्य जरी असला तरी साहित्य पातळीवर मात्र तो शक्य झाला आहे .याच कथासंग्रहातला 'माहेर',' के ','बगळा आणि म्हैस ','पारू',' चिंच ','मादी ','आभा सावंत 'या कथांतून जैविक -नैसर्गिक पर्यावरणाचे विविध रंगी व विविधार्थक संवेदन प्रकट झाले आहे.

'गहिरं' या कथासंग्रहाप्रमाणेच व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसे '(१९४९)यातील व्यक्तीचित्रनेही सांस्कृतिक पर्यावरणीय संवेदननिष्ठ आहेत .या कथासंग्रहातील माणसेही एका विशिष्ट प्राकृतिक हलाखीच्या विधिवासात( इकोसिस्टीम) जगतात .या विधिवासाची स्पष्ट कल्पना माडगूळकरांना आहे .ते म्हणतात ,"माणदेश हा एक तहानलेला मुलुख आहे .तहानेजलेला आणि भुकेलेलाही! ..... त्यांच्या काटेरी जीवनात विनोदाची लाल भडक बोंडेही असतात ,जगण्यावरची त्यांची वासना कधी उठत नाही .मख्ख

ऊन भघा भघा उडणारी धूळ ,मोठ मोठी माळराने असेच या प्रदेशाचे स्वरूप आहे .थेट जमिनीतून वर आलेल्या माणसांच्या पाशी जन्मजात असलेले शहाणपण या लोकांत आहे."(८) व्यंकटेश माडगूळकरांचे हे विधान नैसर्गिक पर्यावरणाच्या विशिष्ट विधिवासात नैसर्गिक प्रकृतीच्या पातळीवरच जगणाऱ्या या माणदेशी माणसांना त्या प्राकृतिक प्रदेशाने येथे साकार केले आहे ,असे अधोरेखित करण्यास भाग पाडणारे आहे. माणदेशातली माणसे त्यांच्या प्राकृतिक विधिवासासह हुबेहूब उभी करणे हे या कथासंग्रहातल्या पर्यावरणीय संवेदनाची इयत्ता वाढवणारेच आहे.

पर्यावरणीय संवेदनांचा आणखी एक उत्कृष्ट नमुना म्हणजे सत्तांतरही कादंबरी सन १९८२ मध्ये प्रकाशित झालेल्या या कादंबरीतून प्राणीसृष्टीतील जीवन संघर्षाचे नाट्य एका वानराच्या टोळीच्या संदर्भाने रंगविले आहे .ज्या नैसर्गिक पर्यावरणात ही प्राणी सृष्टी जगत आहे त्याचा नेमका जैविक संदर्भ या दर्शनाला लाभलेला आहे .अन्नाची अर्थात चरितार्थाची समस्या ,तिचे नैसर्गिक पर्यावरणाशी असलेले नाते, टोळीतील समूहजीवन ,नर-मादी संबंध ,प्रज्योत्पादन ,जीवनकलाचे स्वरूप ,सत्ता आणि सत्तांतराची प्रक्रिया या सर्व घटकांना एका विशुद्ध पर्यावरणीय संवेदनाने या कादंबरीत साकार केले आहे .हे प्राणीसृष्टीचे माहितीपर निवेदन नाही ,तर ते वाङ्मयीन सर्जन आहे .कारण त्यात प्राणीसृष्टीच्या जैविक आकलनाचा एक स्वयंपूर्ण व सुरू होऊन संपणारा आकार प्रत्यक्षात आलेला आहे .त्यामुळे वानराच्या टोळीची माहिती वाचून होणारा परिणाम व या कादंबरीचा परिणाम यात गुणात्मक फरक पडतो या कादंबरीच्या वाचनाने प्राकृतिक जीवनाविषयी एक प्रकारची अंतर्मुखता निर्माण होते दुर्गा भागवतांचे 'ऋतुचक्र',अनंतराव कुलकर्णी 'मी जेनी',आनंद यादवांची 'माऊली ',सुरेश शिंदेंची 'सर्ज्या',गोणी दांडेकरांचा 'शितू 'हा कथासंग्रह ,'पडघवली'ही कादंबरी ,आनंद यादवांची 'गोतावळा ',विश्वास पाटील यांची 'झाडाझडती', मारुती चितमपल्लींचे 'रानवाटा' ,माधुरी खरे यांचे 'समुद्राच्या पाठीवर 'सुरेशचंद्र वारघडे यांचे 'हिमालयातील पुष्प घाटी ',मिना प्रभूंचे 'माझे लंडन ',रंजन गर्गे यांचे 'गिर्यारोहण, 'रम्य साहस ',शांता शेळके यांचे 'आश्चर्यकारक प्राणी सृष्टी 'प्रल्हाद जाधव यांचे 'पाण्यातले दिवस' डॉ. प्रकाश गोळे यांचे सायबेरियातील शोध ',(१९९४),इत्यादी तर 'शेती आणि शेतकरी '(१९२०),'उद्यम'(१९१९), ' शेतकरी '(१९६५),'मराठी विज्ञान परिषद पत्रिका '(१९६८),'विज्ञान युग'(१९६८),' बळीराजा '(१९७०),'वनराई(१९९२) इत्यादी नियतकालिके या सर्वच लेखनांनी समाजाचे वैज्ञानिक व पर्यावरणीय प्रबोधन करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

तात्पर्य ,पर्यावरणीय संवेदन आणि मराठी साहित्य यांच्यातला अनुबंध हा अत्यंत जवळचा असून तो परस्परांश्रयी स्वरूपाचा आहे .कारण माणूस आणि त्याच्या सर्व निर्मिती या पर्यावरणाला वगळून होऊ शकत नाहीत.

**संदर्भ:**

१) पाटील विजय (डॉ) ,'पर्यावरण शास्त्र परिचय ',प्रशांत पब्लिकेशन्स ,जळगाव .आवृत्ती जानेवारी 2023 ,पृष्ठ 11
२) किता प्रु.११
३) किता पृष्ठ क्र. 9
४) कोत्तापल्ले नागनाथ,( डॉ),'समकालीन साहित्य चर्चा 'प्रतिमा प्रकाशन पुणे,आवृत्ती २००६ पान ५.
५) जाधव रा.ग.,'मराठी वांग्मय :स्वातंत्र्योत्तर संदर्भ', प्रतिमा प्रकाशन पुणे ,प्रथम आवृत्ती 24

ऑगस्ट 1998, दोन शब्द पृष्ठ क्रमांक नाही

६) किता पृष्ठ क्र.८७-८८

७) किता पृष्ठ क्र.८५

८) माडगूळकर व्यंकटेश , 'माणदेशी माणसं', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे ,प्रथम आवृत्ती 1 जानेवारी 1949 दोन शब्द.